## कृतज्ञता

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल.(अर्थशास्त्र) या पदवीसाठी " रसवंतीगृहांचे अर्थशास्त्र, कोल्हापूर शहराचा विशेष अभ्यास " हा शोध-प्रबंध तयार करीत असताना मला अनेक व्यक्ती व संस्थांचे सहकार्य लाभले आहे त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

या अभ्यासात माझे संशोधन मार्गदर्शक प्रा.डॉ. व्ही.ओ. धुगे यांचेकडून मला वेळोवेळी महत्वाच्या सूचना, प्रोत्साहन आणि मौलिक मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच प्रस्तुत शोध प्रबंधास पूर्ण स्वरूप प्राप्त झाले आहे, म्हणून मी त्यांचा सदैव ऋणी असून त्यांच्या ऋणातच राहणे मी अधिक पसंत करतो.

संशोधनकार्य करताना आणि शोध-प्रबंध लिहिताना, शिवाजी विद्यापीठाच्या, अर्थशास्त्र विभागातील प्रा.डॉ. ज.फा. पाटील, प्रा.आर. जी. दंडगे, यांचेही मला बहुमोल असे सहकार्य व मार्गदर्शन लाभले, त्यांचाही मी ऋणी आहे. तसेच डॉ.सौ. शांता पंडीत यानी देखील मला अनेक उपयुक्त सूचना करून प्रोत्साहन दिले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

प्रस्तुतच्या संशोधन कार्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाने मला ' टिचर फेलोशी ' शिष्यवृत्ती दिल्यानेच मला हे कार्य वेळेत पूर्ण करता येणे शक्य झाले. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिष्यवृत्तीनुसार पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, एरंडवणा,पुणे या माझ्या संस्थेने एक वर्षाची पगारी रजा मंजूर केल्यानेच सदरचे कार्य हाती घेऊन पूर्ण करता येणे शक्य झाले. त्याबद्दल या दोन्ही संस्थांच्या अध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांचे मानावे तेवढे आभार थोडेच ठरतील.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य, वसंतराव जगताप यांचेकडून मिळालेले प्रोत्साहन सदरच्या कार्यात एक महत्वाचा प्रेरक घटक असून त्यानी जिव्हाळ्याने केलेले मार्गदर्शन, व सूचनांचा मोठा लाभ झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांच्या सदैव ऋणात राहू इच्छितो.

माझ्या एम.फिल्च्या अभ्यास काळाच्या कोल्हापूर येथील वास्तव्यात माझ्या कुटुंबीय मंडळींनी हरतऱ्हेने सहकार्य करून मला सतत प्रोत्साहन दिले त्यातूनच हे कार्य पूर्ण करता आले हे कधीही विसरता येणार नाही. तसेच श्री. विजय वसंतराव लोध व त्यांचे सहकारी, श्री. साहेबराव जगदाळे, श्री. लक्ष्मणराव जगदाळे, श्री. प्रकाशराव जगदाळे, श्री. जयवंतराव पाटील, श्री. शिवाजीराव पाटील, श्री. रामचंद्र पाटील यानी प्रस्तुतच्या कार्यात बहुमोल सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शोध प्रबंधास आवश्यक असलेले प्रकाशित साहित्य मिळवून देण्याच्या दृष्टीने बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कृषी महाविद्यालय, कोल्हापूर यांचे ग्रंथालय येथील प्रमुख अधिकारी व सेवक वर्ग यानी सहानुभूतीपूर्वक केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानने मी माझे कर्तव्य समजतो.

Patil

(पांडुरंग कृष्णाजी पाटील)
संशोधक

कोल्हापूर
दिनांक : 21/8/1990